| MHAM150022362022 | Presented on : 14-10-2022<br>Registered on : 14-10-2022<br>Decided on : 20-01-2024<br>Duration : 1 years, 3 months, 6 days |
|---|---|

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोर्शी, ता.मोर्शी, जि. अमरावती यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी राजेश बा. खंदारे)

**म.सं.कौ.हिं.का अर्ज क्र.६१/२०२२** **निशाणी क्र.- २५**

१. **सौ. वृषाली उर्फ पायल रविंद्र देशमुख**
वय -३० वर्ष, व्यवसाय- घरकाम,

२. **कु. रिषीका रविंद्र देशमुख**
वय- २ वर्षे, करीत अ.पा.क आई
अर्जदार नं. १
रा. हिवरखेड, ता.मोर्शी,
जि.अमरावती, **..... अर्जदार**

**- विरुध्द -**

१. **रविंद्र उर्फ प्रविण बबनराव देशमुख**
वय ४० वर्ष, व्यवसाय-नोकरी व शेती
रा. शिरजगांव बंड, ता. चांदुर बाजार,
जि. अमरावती ...**गैरअर्जदार**

**अर्ज - कौटुंबिक हिंसाचारा पासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम- १२, १५, १७, १८, १९, २० व २२ प्रमाणे.**

अर्जदार तर्फे - श्री. एम. एम. भोपी
गैरअर्जदार तर्फे - श्री. व्ही. डी. पेढेकर

# <u>न्यायनिर्णय</u>

(घोषित दिनांक – २० जानेवारी, २०२४)

अर्जदार व गैरअर्जदार क्रं. १ हे कायद्याने पती पत्नी असुन त्यांचा विवाह दि..२४.०६.२०११ रोजी महादेव महाराज संस्थान, सालबर्डी, ता. मोर्शी येथे संपन्न झाला. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदण्यास त्यांचे एकत्र कुटुंबात लग्नात मिळालेल्या भेटवस्तु, आंधणासह नांदण्यास गेली. लग्नानंतर तीला गैरअर्जदार ऑगस्ट २०१८ पर्यंत गैरअर्जदार यानी चांगले वागवले. फेब्रुवारी २०१८ मध्ये अर्जदार ही गर्भवती असल्याचे व तीच्या पोटातील पाण्याची पातळी कमी असल्याचे दिसुन आले त्यामुळे तीला आरामाची गरज असल्यामुळे ती तीची आई मौजे शिरजगांव येथे राहीली. गैरअर्जदार हा दारु पिवुन शिवीगाळी करणे, तीच्या आईला बोलणे तसेच तीला मारठोक करणे शिवाय, आजारी असतांनाही शरीरसुखाची मागणी असा त्रास देत होता. त्यामुळे दि. १८.०८.२०१८ रोजी सात महीन्याची गर्भवती असतांना तीच्या माहेरी आईवडीलांकडे मौजे हिवरखेड येथे आली. अर्जदार नउ महीन्यांची गर्भवती असतांना गैरअर्जदार यांच्या बहीणीने फोन केला व सांजीचा कार्यक्रम व दिवाळी सण साजरा करण्याकरीता मौजे शिरजगांव येथे सासरी ये असे म्हंटले. गैरअर्जदार गाडी घेवुन तीला नेण्यासाठी आला म्हणुन ती शिरजगांव येथे गेली. तेथे आठ दिवसामध्ये तीच्या लक्षांमध्ये आले की, गैरअर्जदार हा खुप दारु पिवुन कोठही पडतो, तीच्या प्रकृतीची काळजी करीत नाही म्हणुन तीने वडीलांना बोलावुन परत माहेरी हिवरखेड येथे नाईलाजाने आली.

**३.** अर्जदार पुढे कथन करते की, माहेरी आल्यानंतर तपासणीकरीता डॉ. शर्मा, अमरावती यांचेकडे नेले असता त्यांनी सांगीतले की पोटातील पाणी कमी झालेने तातडीने बाळंतपण करावे लागेल व त्यामुळे तीला भरती व्हावे लागेल नंतर तीस-या

दिवशी अर्जदार नं. २ हिचा जन्म झाला. बाळंतपणाचा संपुर्ण खर्च अर्जदार हिचे वडीलांनी केला. नंतर १२ व्या दिवशी बारश्याच्या कार्यक्रमासाठी गैरअर्जदार यास बोलावले परंतु तो आला नाही. अडीच महीन्यानंतर गैरअर्जदार अर्जदार यांना नेण्याकरीता हिवरखेड येथे आला. त्यानंतर अर्जदार ही मुलीसोबत शिरजगांव येथे राहुल लागली. गैरअर्जदाराने तीचे दागीने व्यसनासाठी गहाण ठेवले. जेव्हां अर्जदार गर्भवती होती त्यावेळी गैरअर्जदार यांचे शिरजगांव येथील एका बाईशी अनैतिक सबंध जुळुन आले त्यामुळे तीने त्याबाबत दि. २१.०९.२०२२ रोजी विचारणा केली असता तीला दारु पिवनु खुप मारठोक केली. नाईलाजाने अर्जदार हे दि. २१.०९.२०२२ पासुन तीच्या आईवडीलांकडे राहत आहे. गैरअर्जदार याने केलेल्या अमानविय व कौटूंबीक अत्याचारामुळे अर्जदाराची शारीरीक व मानसिक प्रकृती कमकुवत झाली असुन तिचेकडुन कोणताही कामधंदा होत नाही व तीचेवर सतत औषधोपचार सुरु आहेत. अर्जदाराजवळ कोणत्याही प्रकारचे उत्पन्नाचे साधन नाही त्यामुळे ती पुर्णत: गैरअर्जदार वर अवलंबुन आहे. गैरअर्जदार हा चांदुर बाजार येथील राजेश भेले यांच्या दुकानामध्ये प्रतिमहीना रु. १५,०००/- इतक्या पगारावर नोकरी करतो तसेच त्याला दोन एकर ओलीताची शेती आहे ज्यामध्ये बोअर आहे व त्यापासुन वर्षाकाठी रु. ३,००,०००/- इतके उत्पन्न कमवितो. त्यामुळे गैरअर्जदार ने अर्जदार नं. १ हिला दरमहा १०,०००/- रुपये आणि अर्जदार क्रं. २ हिस दरमहा ५,०००/- रुपये पोटगी खर्च आणि भाडे निवास म्हणुन दरमहा २,०००/- रुपये देण्याची विनंती केली आहे.
व्यवस्था करुन मिळावी अथवा घरभाडयापोटी दरमहा रु. ३,०००/- तसेच भविष्यातील तरतुदी करीता २ लाख रुपये तसेच नुकसान भरपाई म्हणुन २ लाख रुपये आणि लग्नात दिलेल्या आंधण व भेटवसतु परत देण्याचा आदेश करण्याची विनंती केली.

४. गैरअर्जदार यांनी निशानी क्रमांक १५ कडे त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जामधील संपुर्ण मजकुर, त्यांचेमधील नातेसबंध वगळता, नाकारला आहे. गैरअर्जदार

यांनी कथन केले आहे की, त्यांनी अर्जदार नं. १ हिस लग्न झाल्यापासुन ते अ◌ाजपर्यंत चांगली वागणुक दिलेली आहे. लग्नामध्ये कोणताही हुंडा त्यांनी घेतला नाही व त्यांचे वडीलांनी सोने, दागदागिने अर्जदार हिला दिले आहेत. अर्जदार हिला लग्नानंतर गर्भ पिशवीचा त्रास असल्यामुळे तीला मुळबाळ राहत नव्हते त्यामुळे गैरअर्जदार यांनी तीचेवर अमरावती येथील डॉ. मशानकर, डॉ. संध्या काळे, डॉ. जावरकर अशा विविध हॉस्पीटल मध्ये सतत २०१८ पर्यंत उपचार केले व त्याचा संपुर्ण खर्च गैरअर्जदार यांनीच केला. दिवाळीच्या वेळी सांजीचा कार्यक्रमांमध्ये तीला साडी, शालु व कपडेलत्ते चांदुरबाजार येथुन घेवुन दिले परंतु अर्जदाराची तब्येत खराब झाल्यामुळे तीला ६ दिवस अमरावती येथे डॉ. शर्मा यांचे दवाखान्यात ६ दिवस भरती ठेवले व त्यादरम्यान दवाखान्याचा २५ ते ३० हजाराचा खर्च त्यांनीच केला. अर्जदाराच्या ९ व्या महीन्यात सांजीचा कार्यक्रमास रु. १०,०००/- खर्च केला. अर्जदाराच्या बाळंतपणाचा व सिजरचा संपुर्ण खर्च रु. ६५,०००/- त्यांनीच केला. मुलगी झाल्यानंतर त्यांचा संसार व्यवस्थीत होता. अर्जदार ही घरातील कर्ती महीला होती व संपुर्ण व्यवहार तीचे हातामध्ये होता. गैरअर्जदार यास कोणतेही व्यसन नव्हते. अर्जदार ही बचत गटाची सचिव कार्यकर्ती होती व त्या माध्यमातुन कर्ज घ्यायची आणि तीचे कर्ज गैरअर्जदार यांचे वडील भरायचे.

५. गैरअर्जदार पुढे कथन करतात की, त्यांचे वडीलांना सन २०२२ मध्ये हर्नियाचा कर्करोग झाल्यामुळे त्यांना फेब्रुवारी २०२२ ते मार्च २०२२ पर्यत डॉ. पंजाबराव देशमुख हॉस्पीटल येथे भरती होते व त्यांनतर सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, नागपुर येथे उपचार सुरु केले व त्यांना रोज रु. ३००/- चे औषध सुरु आहे. कर्करोग तीला होईल या भीतीने वेगळे राहण्याची मागणी करु लागली. कॅन्सर होईल म्हणुन ती कपडे, दागदागीने व बचतगटाचे कर्ज रु. १०,०००/- घेवुन ऑगस्ट २०२२ मध्ये गेली व तेंव्हापासुन ती तीचे माहेरी राहत आहे. त्यांनी नातेवाईकामार्फत अर्जदार हिस समजाविण्याचा प्रयत्न केला परंतु तीने ऐकले नाही. गैरअर्जदार आजही नांदविण्यास

तयार आहेत. गैरअर्जदार यांचे घरी स्त्री म्हणुन कोणीही नाही. त्यांचे वडील कॅन्सर ने पिडीत असुन त्यांचे वय वर्षे ७८ आहे. अर्जदार हिने हे प्रकरण दाखल केल्यामुळे त्यांना मानसिक व शारीरीक त्रास झाला त्यामुळे चांदुरबाजार येथील मनोहर वस्त्रालय च्या मालकांनी त्यांना गेले तीन महीन्यापुर्वी कामावरुन कमी केले आहे. गैरअर्जदार यांना शेतीच्या उत्पन्नातुन प्रति वार्षीक ७० ते ८० हजार रुपये येतात परंतु त्यांच्या वडीलांचा खर्च हा १ लाखाच्या वर जातो. अर्जदार ही उच्चशिक्षीत असुन तीने संगणकाचे विविध कोर्स केलेले आहे व तीचे ११ वी नंतरचे पुर्ण शिक्षण केले व त्या शिक्षणाचा खर्च गैरअर्जदार यांनी केला. गैरअर्जदारांने मोटारसायकल खरेदी केली आहे व त्याचा दरमहा रु. २४००/- हप्ता भरावा लागतो. सध्या अर्जदार ही खाजगी नोकरी करीत आहे व ७ ते ८ हजार रुपये प्रति महीना कमवित आहे. गैरअर्जदाराची शेती ही वडीलार्जित असुन त्यामध्ये घरातील लोकांचा वारसा हक्काने हिस्सा आहे. सबब, अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**६.** माझे समोर निर्माण झालेले मुद्दे व त्या वरील निष्कर्ष कारणमिमांसे सह येणे प्रमाणे विषद करीत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| (१) | अर्जदार हि संरक्षणात्मक आदेश मिळविण्यास पात्र आहे काय ? | **होय** |
| (२) | अर्जदार हि निवासस्थान किंवा घरभाडयासाठी दरमहा २०००/- रुपये मिळविण्यास पात्र आहे काय ? | **होय, दरमहा रु.१,०००/-** |
| (३) | अर्जदार हे आर्थीक नुकसान भरपाई म्हणुन दोन लाख रुपये मिळविण्यास पात्र आहे काय ? | **रक्कम रुपये १०,०००/-** |
| (४) | अर्जदार हे भविष्याची तरतुद म्हणुन दोन लाख रुपये मिळविण्यास पात्र आहे काय ? | **नाही** |
| (५) | अर्जदार क्रं. १ हिला दरमहा पोटगी १०,०००/- रुपये व अर्जदार क्रं. २ हिला दरमहा ५,०००/- मिळविण्यास | **अंशतः होय. अर्जदार क्रं. १ हिला रक्कम रुपये ३,०००/- दरमहा प्रमाणे व** |

| | | |
|---|---|---|
| | पात्र आहे काय ? | अर्जदार क्रमांक २ हिला २,०००/- दरमहा प्रमाणे |
| (६) | अर्जदार क्रं. १ हीचे वडीलांनी लग्नामध्ये संपुर्ण अ ांधण, भेटवस्तु इ. गैरअर्जदार यांना दिल्याचे व ते परत मिळण्याच्या मागणीस पात्र आहे काय ? | **नाही** |
| (७) | आदेश काय ? | **अर्ज अंशत: मंजूर करण्यात आला.** |

**७.** अर्जदार हिने तिचा अर्ज सिध्द करण्याच्या हेतुने स्वत:ची साक्ष निशानी क्रं. २३ प्रमाणे नोंदविली. अर्जदार हिने नि. २४ कडे पुरसिस दाखल करुन तीचा तोंडी पुरावा बंद केला. गैरअर्जदार यांना संधी देवुनदेखील त्यांनी त्यांच्या म्हणण्यापृष्टर्थ कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार हिने नि. ७ कडे मालमत्ता व दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे तसेच नि. २५ कडे मौजे इमामपुर, ता. चांदुरबाजार येथील गट नं. ३८/३/ब चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. गैरअर्जदार यांनी नि. १७ कडे मालमत्ता व दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ६ प्रमाणे</u>** :-

**८.** अर्जदाराने तिच्या वर झालेला कौटुंबिक हिंसाचार सिध्द करण्याकरीता तिच्या सरतपासाच्या प्रतिज्ञालेखावर (नि. २३) भिस्त ठेवली. त्यामध्ये तिने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जशास तसे पुराव्यामध्ये सांगीतले अ ाहे आणि महत्वाची बाब म्हणजे गैरअर्जदार यांनी तीचा उलटतपास घेवुन तीचा पुरावा आव्हानीत केलेला नाही त्यामुळे तीच्या अर्जामध्ये व सरतपासाच्या पुराव्यामध्ये सांगीतलेल्या कथनांवरती कोणतही संशय घेण्याचे कारण दिसुन येत नाही. गैरअर्जदार यांनी प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये या अर्जास म्हणणे दाखल केले परंतु त्या अनुषंगे कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा दाखल केलेला नाही. शिवाय, अर्जदाराचा पुरावा

उलटतपास घेवुन आव्हानित केला नाही त्यामुळे अर्जदार हिने दाखल केलेल्या पुराव्याचे कुठल्याही प्रकारे खंडण गैरअर्जदार यांचेकडुन झालेले नाही.

९. अर्जदाराने पुराव्यामध्ये असे सांगीतले आहे की, गैरअर्जदार यांच्या शारीरीक व मानसिक त्रासामुळे ती कमजोर झाली असुन तीचे आई-वडीलांकडे राहते. अर्जदार हिचेजवळ कोणतेही उत्पन्नाचे साधन नसुन ती सध्या तीचे आईचे व वडीलांच्या दयेवर जिवन जगत आहे या वरुन असे दिसुन येते की, कुठलीही स्त्री शक्यतोवर हेतुपुरस्सर आपल्या पतीला सोडून माहेरी राहणार नाही म्हणून असे स्पष्ट होते की, गैरअर्जदारांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे.

१०. अर्जदार यांनी तिला दोन लाख रुपये नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केली आहे. अर्जदार हिने एखादे उत्पन्नाचे साधन गैरअर्जदार यांच्यामुळे गमाविले किंवा तिला गैरअर्जदार यांनी दिलेल्या त्रासामुळे वैद्यकीय खर्चाची नितांत आणि तुरंत गरज आहे शिवाय तिच्या मालकीच्या मालमत्तेचे गैरअर्जदार यांचेकडुन नुकसान झाले आहे. अशा प्रकारचा कुठलाही प्रकारचा पुरावा अर्जदार हिने दाखल केला नाही. म्हणून तिने मागणी केल्याप्रमाणे संपुर्ण नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे ती गैरअर्जदाराकडून तिला झालेल्या मानसिक व भावनिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रुपये दहा हजार रुपये मिळणेस पात्र आहे. अर्जदार हिने तिचे आंधन, भेटवस्तु व दाग दागीने गैरअर्जदाराडुन परत मिळणाची मागणी केली आहे. परंतु तिने तिचे पुराव्यामध्ये तिचे लग्नामध्ये कोणते दागदागिणे, भांडी तिला आंधन व स्त्रीधन म्हणुन मिळाले होते व ते गैरअर्जदार यांच्या ताब्यात आहे याचा स्पष्ट उल्लेख नाही व त्याअनुषंगे कोणताही कागदोपत्री पुरावा तीने दाखल करुन शाबीत केलेला नाही.

११. अर्जदार यांनी पोटगी रक्कम रुपये दहा हजार दरमहा व अर्जदार क्रमांक २ साठी दरमहा पाच हजार रुपयांची मागणी केली आहे. अर्जदारांचे म्हणने असे की, ती तिच्या आई वडीलाच्या दयेवर जिवन जगत आहे. या उलट गैरअर्जदार हा चांदुर

बाजार येथील राजेश भेले यांच्या दुकानामध्ये प्रतिमहीना रु. १५,०००/- इतक्या पगारावर नोकरी करतो तसेच त्याला दोन एकर ओलीताची शेती आहे ज्यामध्ये बोअर आहे व त्यापासुन वर्षाकाठी रु. ३,००,०००/- इतके उत्पन्न कमवितो असे पुराव्यामध्ये सांगीतले आहे. अर्जदार हिने नि. २५ कडे मौजे इमामपुर, ता. चांदुरबाजार येथील गट नं. ३८/३/ब चा ७/१२ उतार दाखल केलेला आहे, सदर उता-याचे अवलोकन केले असता दिसुन येते की, गैरअर्जदार यांचे नावे ० हे ८१ आर जमिन असुन त्यामध्ये बोअरवेल आहे परंतु त्यामध्ये सोयाबीन व हरभरा अशी खरीप व रब्बी पिके घेत असल्याचे दिसुन येते.

**१२.** नि. २५ कडील ७/१२ उता-यावरुन गैरअर्जदार यांचे मालकीची व त्यांचे नावावरती दोन एकर जमिन दिसुन येते त्यामुळे गैरअर्जदार याला त्या शेतीतुन वर्षाकाठी काही ना काही उत्तन्न मिळत असावे असे दिसुन येते अर्थातच अर्जदार नं. १ चे पती पती व अर्जदार नं. २ चे वडील या नात्याने अर्जदार यांना पोटगी देण्यास तो सक्षम आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा पुरावा आव्हानीत न केल्यामुळे त्यावर संशय घेण्याचे कोणतेही कारण दिसुन येत नाही. अशा प्रकारे उभय पक्षांचे रहिवास व उत्पन्नाचे साधन व जिवानाश्यक वस्तुंचे वाढते दर लक्षात घेता, गैरअर्जदार याने अर्जदार हिला महिन्याकाठी रु. ३,०००/- व अर्जदार कं.२ हिला २,०००/- रुपये व निवासाकरीता घरभाडे म्हणुन दरमहा रु. १,०००/- देणे उचित वाटते आणि त्यामुळे त्यांना भविष्याच्या तरतुदीसाठी वेगळी रक्कम देण्याची आवश्यकता दिसुन येत नाही. अर्जदार हिने तिला गैरअर्जदार याचेकडून कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिध्द केलेले आहे. अशा प्रकारे मुद्दा क्रं. १ ते ६ चे उत्तर नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्रमांक -७</u> :-**

**१३.** गैरअर्जदाराने अर्जदार हिला सदरचा अर्ज दाखल करण्यास नाहक भाग पाडले. त्यामुळे ती त्यांच्या कडून रक्कम रुपये दोन हजार सदरच्या अर्जाच्या खर्चापोटी

मिळण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्रं. ७ च्या उत्तरास खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

(१) अर्ज अंशत: मंजूर करण्यात आला.

(२) गैरअर्जदार यांना अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार कृत्या करीता प्रतिबंधीत करण्यात येत आहे.

(३) गैरअर्जदार यांनी अर्जदार नं. १ यांना दरमहा रु. ३,०००/- तीन हजार आणि अर्जदार नं. २ हिला दरमहा रु.२,०००/- दोन हजार आजपासुन पोटगी म्हणून दयावी.

(४) गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना घरभाडे म्हणुन दरमहा रु. १,०००/- एक हजार रुपये इतकी रक्कम आजपासुन दयावी.

(५) गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला रु.१०,०००/- दहा हजार रुपये नुकसान भरपाई म्हणून दयावेत.

(६) गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु. २,०००/- दोन हजार दयावेत.

(७) अर्जदार व पोलीस स्टेशन अधिकारी, मोर्शी यांना सदर आदेशाची प्रत विना मूल्य पुरविण्यात यावी.

दिनांक २०.०१.२०२४

(राजेश बा. खंदारे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मोर्शी.